नि.दि.ख.क्र.-१७०/२०२३
संजय वि रामप्रसाद
निशाणी क्र. १४ च्या पुढे

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ संजय भैयाजी बन यांचा सरतपास वादीतर्फे वकील श्री. व्ही. डी. मेटकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

**७.** माझे पुराव्याचे शपथपत्र **निशाणी क्र.१४** मध्ये लिहिलेला मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर लिहिण्यात आला असून तो वाचून-समजून मी त्यावर सही केली आहे.

**८.** मी दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादीला दि. ०५.०७.२०२३ रोजी वकीलांमार्फत नोटीस दिली. मला नोटीस दाखवण्यात आली. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १५** देण्यात येते. सदरची नोटीस मी प्रतिवादीला पोस्टाने पाठवली. त्याची पावती व पोच पावती मी दाखल केली आहे. त्यास अनु. **निशाणी क्र. १६ व १७** देण्यात येते. मी व प्रतिवादी यांच्यामध्ये दि. २४.०८.२०२० रोजी बिनव्याजी उसनवारीचा करारनामा करण्यात आला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी, प्रतिवादीची व दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १८** देण्यात येते.

**प्रतिवादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा पुकारा केला असता, गैरजहजर. सबब, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.01.08 16:26:19 +0530

दिनांक – ०८.०१.२०२६.
सावनेर.

(एस. एम. गाडे)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर,
सावनेर, जि. नागपूर.

नि.दि.ख.क्र.-१७०/२०२३
संजय वि रामप्रसाद
<u>निशाणी क्र. १४ च्या पुढे</u>

C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe